| MHRG040006862024 | विशेष दिवाणी दावा क्र. ९६/२०२४<br>श्री. विवेक बालाळी बिराजदार<br>वि<br>श्री. रोशन अनंत पाटील |
|---|---|

## नि.क्र.१७ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जात प्रतिपादन केले आहे की, प्रतिवादी यांना मे. कोर्टामार्फत समन्स व नोटीस काढण्यात आलेली होती. सदर समन्स व नोटीस दि. २०/०४/२०२४ रोजी प्रतिवादी यांना प्राप्त झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी हे त्यांचे वकीलांमार्फत दि. २२/०४/२०२४ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेकामी सुमारे २५५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांच्या विरोधात दि. ०८/११/२०२४ रोजी विना कैफियत दावा सुनावणीचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत व निशाणी क्र. ५ वर म्हणणे देणेकरीता आवश्यक असलेले कागदपत्र हे सिडको कार्यालयातील आहेत. वादीने सदर दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी सदर दावा मिळकतीसंबंधीत सिडको कार्यालयात असलेले कागदपत्र मिळणेस उशीर झाल्याने मुदतीत सदरचे कागदपत्र प्रतिवादीस वकीलांकडे देणे शक्य झाले नाही. तसेच प्रतिवादी यांचे इतर काम ही वादींचे वडीलांकडे असल्याने दावा भुखंडाबाबत करण्यात आलेला करार हा प्रतिवादी यांनी केलेला नव्हता. परंतु, वादींचे वडीलांनी प्रतिवादी यांचे इतर कोर्ट कामाकरीता काही कागदपत्रांवर सहया घेतल्या होत्या त्या संबंधीत माहीती घेण्यास वादीस उशीर झालेला असल्यामुळे मुदतीत प्रतिवादी यांना म्हणणे व कैफियत दाखल करता आले नाही. त्यामुळे त्यांना दाव्यात कैफियत दाखल करण्यास २५५ दिवसांचा विलंब झालेला आहे.

३. वादीतर्फे सदर अर्जावर म्हणणे निशाणी १९ खाली दिले आहे. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना दि. २२/०४/२०२४ रोजी समन्सची बजावणी झाली असून कायदयाप्रमाणे प्रतिवादीने मुदतीत त्यांचे म्हणणे/कैफियत दाखल करणे गरजेचे होते. असे असतानाही प्रतिवादीने मुदतीत त्यांचे म्हणणे/कैफियत दाखल करण्याकरीता मा. न्यायालयाकडून मुदत वाढ घेतली नाही. सबब प्रतिवादी यांना ब-याच संधी देवून त्यांनी कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादीने विलंबास नमूद कारण हे चुकीचे दिले असून ते संयुक्तीक नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना २५५ दिवसांचा विलंब झालेला आहे. करीता अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४.  अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५.  वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत** -

६.  न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा विलंब हा प्रतिवादी यांना मुदतीत कागदपत्र वकीलांकडे देणे शक्य नसल्यामुळे झाला आहे, त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत मुदतीमध्ये दाखल करता आलेली नाही. प्रतिवादी यांनी जाणूनबुजुन कैफियत दाखल करण्यास उशीर/विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांचा विना कैफियतीचा झालेला आदेश खर्चासह मंजूर करणेत आलेला आहे. प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर अर्जाचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता झालेला २५५ दिवसांचा विलंब विनाखर्च माफ करणे योग्य व संयुक्तिक होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी यांचा अर्ज (निशाणी १७) विनाखर्च मंजूर करणेत येत आहे.

UMA YASH BORADE KAPOOR
Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.03.10 12:07:07 +0530

ठिकाण – पनवेल

**(यू. वाय बोराडे-कपूर)**

दिनांक – ०९/०३/२०२६

४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पनवेल.